# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र  जिल्हा District मुंबई  पोलीस ठाणे Police Station खार  पहिली खबर क्र. FIR No. 13  वर्ष Year 2026  दिनांक Date 19/05/2026

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम  कलमे Sections 7, 12
   (ii) अधिनियम Act 1988  कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : बार Day सोमवार  तारीख पासून Date from 18/05/26  वेळ Time 17:00  तारीख पर्यंत Date to 19/05/26  वेळ Time 19:06

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करा (Tick applicable portion).

   (1) ००.०० ते ०३.००  (2) ०३.०० ते ०६.०० ✓  (3) ०६.०० ते ०९.००  (4) ०९.०० ते १२.००  (5) १२.०० ते १५.००
   (6) १५.०० ते १८.००  (7) १८.०० ते २१.००  (8) २१.०० ते २४.००

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची ला.प्र.वि.मुंबई तारीख 18/05/2026 वेळ 15.00
   Information received at P. S. Date Time

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 03/26 तारीख 19/05/2026 वेळ 07.05
   General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी  लेखी / तोंडी Written / Oral ......

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा पश्चिम 10 km  चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ......
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.  Chouki / Beat / O. P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name खार पो. ठाणे  ठिकाणाचे नंबर No. if any सांताक्रुझ  गल्ली Ward पश्चिम  रस्त्याचे नाव Name of road S.V. रोड

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place खार रेल्वे  गाव Village स्टेशन  पोस्ट Post ......  तालुका Taluka ......  जिल्हा Dist. ......  राज्य State ......

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव ......  तालुका Taluka ......  जिल्हा Dist. ......  राज्य State ......
   In case, outside the limit of this Police Station

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name सुनिल राम शिंदे
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name राम
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 47 वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय  फोन नं. Phone No. 7039565918
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......  दिल्याचा दिनांक Date of issue ......  दिल्याचे ठिकाण Place of Issue ......
   (f) व्यवसाय Occupation ......
   (g) धर्म Religion हिंदू  जात Caste ......  जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता Address खार दांडा  गल्ली/सर्वे नं. Ward मधला रोड  घर/नाव नं. House Name No. खार (प)  फोन/मो. नं. Phone No. ......  पॅन नं. Pan No. ......  वोटर्स नं. Card No. ......

   रस्त्याचे नाव Road ......  जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ......  गाव Village ......  पोस्ट Post ......  पो. स्टे. P. Stn. ......

   तालुका Taluka ......  जिल्हा Dist. ......  राज्य State ......  सध्याचा पत्ता Present Address खार दांडा

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभिलेखा यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   ① हसवराज स्वामीनाथ धमगुंडे - 42 वर्षे व्यवसाय - नोकरी (पो.ह. 060677) खार पो.ठाणे. मुंबई, रा.ठी. - 2/13 68 नवीन पोलीस वसाहत माहिम (प) मुंबई.
   ② अमितकुमार दल बैठा खाजगी इसम रा.ठी. मारुती निवास, रुम नं. - 101, आरदांडा कोस्टल रोड, दांडा (प) मुंबई.



Scanned with CamScanner

यातील फिर्यादी नामे सुनिल हाळाडे सहायक पोलीस आयुक्त यांचा दिनांक 29/05/2026 रोजीचा जबाब स्वतंत्र पानावर जोडलेला असुन ती गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

PI रेखा [illegible]

...राने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

...asons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

0. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील तक्रारदार यांचे मुलीचे पासपोर्ट आहि कागदपत्रांची पडताळणी करायची होती. त्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार यांच्या मुलीला पो. स्टेशन येथे बोलावले पण कागदपत्र पडताळणी केली नाही. त्यानंतर अनेकवेळा तिने आलोसे यांना विचारणा केली पण आलोसे हे टाळाटाळ करत होते. त्यामुळे तक्रारदार यांच्या मुलीने तक्रारदार यांना पो. ठाणे येथे चौकशी करण्यास सांगितले असता आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे दोन हजार रुपयांची मागणी केली. व तडजोडीअंती १,०००/-रु. खाजगी इसमास देण्यास सांगितले.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : सुषमा खोत (पोलिस निरीक्षक)

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .......... Rank .......... No. ..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

[signature]

संपूर्ण नाव Name .......... रेखा दुधभाते
पदनाम Rank .......... पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ..........
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer. | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner

दिनांक १९/०५/२०२६

फिर्याद

मी, सुनिल केशव हारूगडे, वय ४५ वर्षे, व्यवसाय : नोकरी (सहायक पोलीस आयुक्त), नेमणूक – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ९९२१०६३५५३

---

मी वरील प्रमाणे असून, दिनांक १५/१०/२०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे सहायक पोलीस आयुक्त या पदावर नेमणुकीस आहे.

मी सोमवार, दिनांक १८/०५/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्रमांक ३३/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता पर्यवेक्षक अधिकारी म्हणून माझी व सापळा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक, रेखा दुधभाते यांची नेमणूक केल्याबाबत आदेश मिळाल्याने नमुद पडताळणीमधील तक्रारदार श्री सुनिल राम शिंदे यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने विचारणा केली तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, तक्रारदार यांचे मुलीने पासपोर्ट मिळणेकरीता फॉर्म भरला होता. दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पासपोर्ट ऑफीसकडुन तक्रारदार यांचे मुलीच्या कागदपत्रांची पडताळणी झाली. त्यानंतर तक्रारदार यांचे मुलीस ७९७७७९४३४९ या मोबाईल नंबरवरुन खार पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार श्री बसवराज धमगुंडे यांनी कॉल करून दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी खार पोलीस ठाणेस हजर राहणेबाबत कळविले. सदरदिवशी तक्रारदार यांची मुलगी लोकसेवक श्री धमगुंडे यांना भेटली असता, त्यांनी पासपोर्टचे प्रकरणे हे त्यांचेकडे आले असून पुढील प्रक्रिया ते करणार असल्याचे सांगितले. तक्रारदार यांचे मुलीने वेळोवेळी त्यांचे पासपोर्टबाबत लोकसेवक श्री धमगुंडे यांचेकडे पाठपुरावा केला परंतु लोकसेवक श्री धमगुंडे हे तक्रारदार यांचे मुलीचे पासपोर्टची पडताळणी करण्यासाठी टाळाटाळ करीत होते. सदरबाबत तक्रारदार यांचे मुलीने तक्रारदार यांना सांगितल्याने दिनांक १५/०५/२०२६ रोजी तक्रारदार यांनी लोकसेवक श्री धमगुंडे यांची प्रत्यक्ष भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे मुलीचे पासपोर्ट प्रकरण त्यांचेकडे चौकशीसाठी आल्याचे सांगितले व सोमवारी किंवा मंगळवारी पुढे पाठवतो असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री धमगुंडे यांनी तक्रारदार यांना "माझे काय?" असे विचारले असता, तक्रारदार यांनी त्यांना "कशाबाबत?" असे विचारले, त्यावेळी ते लोकसेवक श्री धमगुंडे हे तक्रारदार यांना पासपोर्ट रुमच्या बाहेर घेवुन आले व पासपोर्ट काढण्यासाठी "तुम्हाला मला दोन हजार रुपये दयावे लागतील, मग मी तुमचे पासपोर्टचे काम पूर्ण करुन देतो" असे म्हणाले व त्यांनी तक्रारदार यांना त्यांचा मोबाईल नंबर ९८२१६१९८४२ हा दिला व कॉल करण्यास सांगितले. तक्रारदार यांना लोकसेवकास लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि. मुंबई येथे दिनांक १८/०५/२०२६ रोजी संगणकावर टंकलिखीत केलेला लेखी तक्रार अर्ज दिला आहे.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री अभिजीत बाळासो काटे, वय ३५ वर्षे, धंदा – नोकरी, पद – लिपीक टंकलेखक, कार्यालय – प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली, दहिसर पश्चिम, मुंबई रा.ठि. – एफ/१, २०३, नवरे नगर, अंबरनाथ पूर्व २) श्री अमित दत्तात्रय सावंत, वय ३६ वर्षे, धंदा – नोकरी, पद – प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी पश्चिम, मुंबई रा.ठि. – जे.पी. नॉर्थ इंम्पेरीयल पॉवर २, ९०४, विनय नगर, मिरा रोड, जिल्हा ठाणे यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांना तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून पोनि रेखा दुधभाते व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन मी, तसेच दोन्ही पंचानी स्वीक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सर्वप्रथम लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षामधून पंचासमक्ष तक्रारदार श्री सुनिल शिंदे यांनी त्यांचे मोबाईल नंबर ७०३९५६८९८७ वरून लोकसेवक श्री धमगुंडे यांचे मोबाईल क्रमांक ९८२१६१९८४२ वर १६.३२ वा. फोन केला असता,

Scanned with CamScanner

लोकसेवक यांनी तक्रारदार यांचा कॉल उचलला नाही. म्हणून तक्रारदार श्री सुनिल शिंदे यांना शासकीय पंच क्र. ०१ श्री अभिजीत काटे यांचे सोबत लोकसेवक यांचे कार्यालयात पाठवून त्यांचे तक्रारीची पडताळणी करणार व त्यामध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास पुढील सापळा कारवाई करणार असल्याचे मी तक्रारदार व पंचाना सांगितले. त्यानंतर मी, पोनि दुधभाते, दोन्ही पंच व तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.शि. विशाल मिंडे यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन पोनि दुधभाते, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व तक्रारदार यांचे सोबत पाठविण्यात येणारे पंच नंबर ०१ श्री अभिजीत काटे यांना पडताळणी कारवाईच्या आवश्यक त्या सूचना दिल्या.

त्यानंतर आम्ही दिनांक १८/०५/२०२६ रोजी १६.५० वा. लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता बाहेर पडलो. शासकीय वाहनाने मी, पोनि दुधभाते, तक्रारदार, दोन्ही पंच, व सापळा पथक असे पोलीस वाहनाने टाटा शोरूमजवळ, ८ वा रस्ता, खार (पश्चिम), मुंबई येथे १७.१० वा. आलो. तेथे मी व पोनि दुधभाते यांनी तक्रारदार व तक्रारदार यांचे सोबत जाणारे पंच नंबर ०१ श्री अभिजीत काटे यांना पडताळणी कारवाईच्या संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या.

त्यानंतर पोनि दुधभाते यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे पोशि मिंडे यांनी १७.३१ वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजूस कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने लावून पंच श्री अभिजीत काटे यांचेसह लोकसेवक यांना भेटण्यासाठी ऑटो रिक्षाने लोकसेवक यांचे कार्यालय असलेले खार पोलीस ठाणे येथे पाठविले. सदर प्रत्यक्ष भेटी दरम्यान लोकसेवक श्री बसवराज धमगुंडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे प्रलंबित कामाकरीता रूपये २,०००/- इतक्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती रूपये १,०००/- इतक्या लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबूल करून लाचेची रक्कम हि एका तासात घेवून येण्यास सांगितले. वर नमुद भेटी दरम्यान लोकसेवक व तक्रारदार यांचेमधील झालेले बोलणे हे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे ध्वनी मुद्रीत करण्यात आले आहे.

पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री धमगुंडे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रूपये १,०००/- ही एका तासात घेवून बोलाविल्याने आजच सापळा पूर्व व सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर पोलीस वाहनामध्येच सापळा पूर्व कारवाई करण्यात आली. सापळा पूर्व कारवाई दरम्यान तक्रारदार यांना लोकसेवकांना दयावयाची लाचेची रक्कम रूपये १,०००/- बाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचेकडील रक्कम रूपये १,०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या २ भारतीय चलनाच्या नोटा) हजर केली. माझे सूचनेप्रमाणे नमूद नोटांचा फोटो सापळा पथकातील अंमलदार श्री तेली यांनी त्यांचे मोबाईलमध्ये काढला व माझे सूचनेप्रमाणे पंचासमक्ष पोलीस वाहन चालक श्री कदम यांनी वर नमूद रूपये १,०००/- इतक्या लाचेच्या रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावली व सदरची लाचेची रक्कम तक्रारदार यांचे शर्टाच्या वरच्या खिश्यामध्ये ठेवली.

मी व पोनि दुधभाते यांनी तक्रारदार, पंच व सापळा पथकास सापळा कारवाईच्या संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या व लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे स्वतःच्या डोक्यावरून डावा हात फिरवून लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारली असल्याबाबत इशारा करण्यास सांगितले.

समक्ष,

(रेखा दुधभाते)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

ठरल्याप्रमाणे मी, पंच क्र. ०२ श्री अमित सावंत व मपोशि धुळप हे खार पोलीस ठाणेच्या पासपोर्ट कक्षा जवळ कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीले. त्यानंतर पोनि दुधभाते यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे पोशि मिंडे यांनी १८.२२ वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने लावून पंच श्री अभिजीत काटे यांचेसह लोकसेवक यांना भेटण्यासाठी ऑटो रिक्षाने लोकसेवक यांचे कार्यालय असलेले खार पोलीस ठाणे येथे पाठविले. त्यांचे मागोमाग पोनि दुधभाते व उर्वरीत पथक देखिल ऑटो रिक्षाने खार पोलीस ठाणेजवळ आले. तेव्हा तक्रारदार व पंच श्री काटे हे खार पोलीस ठाणेमध्ये गेले व पोनि दुधभाते सापळा पथकासह पोलीस ठाणेच्या बाहेर थांबून राहीले.

तक्रारदार व पंच श्री काटे खार पोलीस ठाणेच्या पासपोर्ट कक्षामध्ये जावून लोकसेवक श्री धमगुंडे यांना भेटले व बराच वेळ पासपोर्ट कक्षाबाहेर थांबून राहीले. त्यानंतर लोकसेवक श्री धमगुंडे हे कक्षाबाहेर आले व तक्रारदार यांचे सोबत बोलू लागले. लोकसेवक श्री धमगुंडे यांनी तक्रारदार यांना चालत चालत पोलीस ठाणेच्या बाजूस असलेल्या बृहन्मुंबई महानगर पालीकेच्या वसाहतीजवळ घेवून गेले तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक श्री धमगुंडे यांना लाचेची रक्कम रूपये १,०००/– घेवून आले असल्याबाबत सांगितले असता, लोकसेवक श्री धमगुंडे यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम हि त्यांचे बाजूस उभ्या असलेल्या सुजूकी एसेस मोटार स्कुटर क्र. एम.एच. ०१ ई.डी. ८१०० च्या पुढील बाजूच्या छोटया कप्प्यामध्ये ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लाचेची रक्कम रूपये १,०००/– हि सुजूकी एसेस मोटार स्कुटर क्र. एम.एच. ०१ ई.डी. ८१०० च्या पुढील बाजूच्या छोटया कप्प्यामध्ये ठेवली. तेव्हा लोकसेवक श्री धमगुंडे हे त्यांचे मित्रांसह चहा पिण्याकरीता जात असल्याचे सांगून तेथून निघाले. त्यानंतर तक्रारदार हे तेथून निघून खार पोलीस ठाणेच्या बाहेर आले व त्यांचे डोक्यावर डावा हात फिरवून लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा पोनि दुधभाते व पथकाने तक्रारदार यांचेकडे जावून पोनि दुधभाते यांचे सुचनेप्रमाणे पोशि मिंडे यांनी तक्रारदार यांचे शर्टास लावलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. त्यावेळी १९.०६ वाजले होते. तेव्हा पोनि दुधभाते यांनी तक्रारदार यांना काय घडले ? याबाबत विचारले असता, तक्रारदार यांनी लोकसेवक श्री धमगुंडे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रूपये १,०००/– हि त्यांचे सांगण्याप्रमाणे पासपोर्ट कक्षा मागील व पोलीस ठाणेच्या जवळ बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या वसाहती जवळ पार्क केलेल्या सुजूकी एसेस मोटार स्कुटर क्र. एम.एच. ०१ ई.डी. ८१०० च्या पुढील बाजूच्या छोटया कप्प्यामध्ये ठेवली असल्याचे सांगून लोकसेवक श्री धमगुंडे हे चहा पिण्याकरीता गेलेले असल्याचे सांगितले. सदरबाबत पोनि दुधभाते यांनी मला कळविले असता मी व माझे सोबत असलेल्या पंच क्र. ०२ श्री सावंत आणि सापळा पथकाने सुजूकी एसेस मोटार स्कुटर क्र. एम.एच. ०१ ई. डी. ८१०० च्या पुढील बाजूच्या छोटया कप्प्याची तपासणी केली असता, तेथे लाचेची रक्कम मिळून आली नाही. त्यानंतर पोनि दुधभाते, तक्रारदार, पंच क्र. ०१ व त्यांचे सोबत असलेल्या पथकाने पोलीस ठाणेच्या आजूबाजूस असलेल्या चहाच्या टपऱ्यांवर लोकसेवक श्री धमगुंडे यांचा शोध घेतला. त्यावेळी लोकसेवक श्री धमगुंडे हे खार पोलीस ठाणेच्या मागील बाजूस खार रेल्वे स्टेशन रोडवर असलेल्या एका चहाच्या टपरीवर चहा पितांना दिसून आले. तेव्हा पोनि दुधभाते यांचे सुचनेप्रमाणे पंचासमक्ष सापळा पथकाने १९.१५ वा. लोकसेवक श्री धमगुंडे यांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या लोकसेवकास त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव व पत्ता – बसवराज स्वामीनाथ धमगुडे, वय ४२ वर्षे, पद – पोलीस हवालदार क्र. ०६०६७७, नेमणूक – खार पोलीस ठाणे, मुंबई राहि – २/६८, नवीन पोलीस वसाहत,

समक्ष,

(रेखा दुधभाते)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

माहीम, मुंबई असे सांगितले. पोनि दुधभाते यांनी लोकसेवक श्री धमगुंडे यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. म्हणुन त्यांना ताब्यात घेवून खार पोलीस ठाणेच्या पासपोर्ट कक्षामध्ये आलो. सुजूकी एसेस मोटार स्कुटर क्र. एम.एच. ०१ ई.डी. ८१०० पार्क केलेल्या ठिकाणाची पाहणी केली असता, बाजुस असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालीकेच्या एका बिल्डिंगमधील तळमजल्याच्या रुमच्या दरवाजावर सीसीटिव्ही कॅमेरा लावला असल्याचे दिसून आले. नमुद सीसीटिव्ही कॅमेऱ्याची पाहणी केली असता, तकारदार यांनी लाचेची रक्कम मोटार स्कुटरच्या कप्प्यामध्ये ठेवल्यानंतर लोकसेवक यांचे सोबत चहा पिण्याकरीता गेलेल्या काळया रंगाचे शर्ट व फिक्कट निळया रंगाची जिन्स पॅन्ट परिधान केलेला इसम हा मोटार स्कुटरच्या कप्पामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम काढून घेवून जात असल्याचे दिसून आले. सदरच्या इसमाबाबत लोकसेवक श्री धमगुंडे यांना विचारणा केली असता, नमूदचा इसम हा त्यांचा मित्र नामे श्री संजित कुमार रुदल बैठा असल्याचे सांगितले. त्यावर खार पोलीस ठाणेच्या पासपोर्ट कक्षामध्ये कार्यरत असलेले श्री मांढरे यांचे मोबाईलवरून श्री संजित कुमार यांना संपर्क करून त्यांना पासपोर्ट कक्षामध्ये बोलाविण्यात आले. २०.१५ वा. श्री संजित कुमार हे पासपोर्ट कक्षामध्ये आल्यानंतर त्यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांचे नाव श्री संजित कुमार रुदल बैठा राहि – मारूती बिल्डिंग, रुम नंबर १०१, खारदांडा, कोस्टल रोड, दांडा खार पश्चिम, मुंबई असे सांगितले.

पोनि दुधभाते यांनी श्री संजित कुमार यांना त्यांनी सुजूकी एसेस मोटार स्कुटर क्र. एम.एच. ०१ ई. डी. ८१०० च्या पुढील बाजुच्या कप्प्यामध्ये ठेवलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत सविस्तर विचारले असता श्री संजितकुमार यांनी सांगितले कि, लोकसेवक श्री धमगुंडे यांचे सांगण्याप्रमाणे त्यांनी नमूदची रक्कम मोटार स्कुटरमधून काढून स्वत: जवळ ठेवलेली असल्याचे सांगितले व श्री संजित कुमार यांनी त्यांचे पॅन्टच्या डाव्या खिशामधून रुपये १,०००/– एवढी रक्कम बाहेर काढली. नमूदच्या रक्कमेच्या नोटांची पाहणी केली असता सापळा पुर्व कारवाई मध्ये फोटो काढलेल्या रूपये १,०००/– च्या नोटांचे नंबर व ताब्यात घेतलेली लाचेची रक्कमेच्या नोटांचे नंबर हे सारखेच असल्याचे दिसून आले. तसेच श्री संजित कुमार यांचेकडून हस्तगत केलेल्या लाचेच्या रक्कमेची अल्ट्राव्हायलेट व्हायलेटच्या बॅटरीखाली तपासणी केली असता, नमूदच्या लाचेच्या रक्कमेस अॅन्थ्रासिन पावडर लावलेली असल्याचे दिसून त्यावर निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर खार पोलीस ठाणेस यशस्वी सापळा कारवाईची उर्वरीत कार्यवाही पुर्ण करून उर्वरीत कार्यवाहीकरीता आम्ही सर्व ताब्यात घेतलेल्या लोकसेवक श्री धमगुंडे व खाजगी इसम श्री संजित कुमार यांचे सह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी दिनांक १८/०५/२०२६ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री धमगुंडे यांनी तक्रारदार श्री सुनिल राम शिंदे यांना त्यांचे मुलीचे पासपोर्टचे पडताळणीचे कामकाज करून देण्याकरीता प्रथम रूपये २,०००/– इतक्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती रूपये १,०००/– इतक्या लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबूल केले व त्याच दिवशी नमूदची मागणी केलेली लाचेची रक्कम रूपये १,०००/– हि लोकसेवक श्री बसवराज धमगुंडे यांनी खाजगी इसम श्री संजित कुमार बैठा यांचे मार्फतीने स्विकारली. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ व १२ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(रेखा दुधभाते)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner